Micro Technologies

# March 08 Aajchi Navi Mumbai

## मायक्रो टेक्नॉलॉजीमुळे वाहनधारकांना लाभ

मुंबई : मायक्रो टेक्नॉलॉजी कंपनीतर्फे मोबाईल फोन आणि वाहनांच्या सुरक्षेसाठी मायक्रो एचएमएस आणि मायक्रो व्हीवीवी आदी उत्पादने बाजारपेठेत आणण्यात आली आहेत. मायक्रो व्हीवीवी या जादुई बॉक्समुळे वाहनचोरीला प्रतिबंध बसणार आहे, असा कंपनीचा दावा आहे.

सुरक्षा उत्पादनांच्या वाढत्या बाजारपेठेत श्रीलंकेत मायक्रो उत्पादनाचा आणि मायक्रो उत्पादनांच्या लायसन्सचा प्रवेश आय सिस्टिम कंपनीशी मायक्रो टेक्नॉलॉजी कंपनीने घेतलेल्या धोरणात्मक सहमतीनुसार झाला आहे. गेल्या २० वर्षांपासून कोलंबोस्थित आय सिस्टिम कंपनी बांधकाम आणि रियल इस्टेट क्षेत्रात आहे. मायक्रो टेक्नॉलॉजी कंपनीच्या सुरक्षा उत्पादनांसाठी श्रीलंका एक वाढत जाणारी बाजारपेठ आहे. घरे आणि वाहनांच्या वाढत्या सुरक्षेसाठी मायक्रो टेक्नॉलॉजी कंपनीने नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाने मायक्रो एचएमएस आणि मायक्रो व्हीवीवी आदी उत्पादने बनविली आहेत. श्रीलंकेतील सुरक्षा उत्पादनांच्या बाजारपेठेत कंपनीची घर सुरक्षा उत्पादनांच्या श्रेणीत जास्त लक्ष देण्याची इच्छा आहे, असे मायक्रो टेक्नॉलॉजी कंपनीचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर मुकुंद गुप्ता यांनी सांगितले.

मायक्रो टेक्नॉलॉजी इंडिया कंपनी वैश्विक दृष्टी असलेली अत्यावश्यक सुरक्षा उत्पादने आणि जीवन रक्षा उत्पादने बनविणारी कंपनी आहे. मोबाईल फोन्स आणि वाहने यांच्या सुरक्षेसाठी मायक्रो एचएमएस आणि मायक्रो व्हीवीवी आदी उत्पादने मायक्रो टेक्नॉलॉजी कंपनीने बाजारात आणली आहेत. या कंपनीच्या उत्पादनांना नाविन्य, अचूकता आणि दर्जासाठी जगमान्यता आहे.

मायक्रो व्हीवीवी या जादुई बॉक्समुळे शिवडी येथे राहणाऱ्या नंदकिशोर खोसे यांची स्कॉर्पिओ गाडी चोरीस जाण्यापासून वाचली. खोसे यांनी त्यांची स्कॉर्पिओ घराजवळ पार्क केली होती. ६ फेब्रुवारी २००८ रोजी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास स्कॉर्पिओमधील व्हीवीवी यंत्रणेमुळे, स्कॉर्पिओ गाडीचा दरवाजा अज्ञात चोरट्यांनी उघडताच खोसे यांना एसएमएस आला. त्यानंतर खोसे गाडी लावलेल्या ठिकाणी गेले असता त्यांना गाडीमध्ये चोरीच्या इराद्याने घुसलेले अज्ञात इसम आढळले. मात्र खोसे यांना पाहताच अज्ञात चोरट्यांनी त्यांची स्कॉर्पिओ सोडून पलायन केले.